# महासागरी मच्छिमारांची आंतरराष्ट्रीय संस्था, भारत, यांच्या पाठिंब्यार्थ आंतरराष्ट्रीय संघटन

## एकतेचा पुनरुच्चार : किनारी समूह आणि भारतीय महासागराचे भविष्य

### भविष्याचा आराखडा

१) आपण मोझांबिक, दक्षिण आफ्रिका, केनया, टांझानिया, मादागास्कर, भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांग्लादेश, थायलंड, इंडोनेशिया, मालदिव्ज, सेश्येल या हिंदी महासागर प्रदेशातील तेरा देशांचे प्रतिनिधी फ्रान्स, बेल्जिअम, युनायटेड किंगडम् आणि नॉर्वे या देशातील प्रतिनिधींबरोबर भारतातील चेन्नई (मद्रास) येथे ९ ते १३ ऑगस्ट, २००१ या कालावधीकरता एकत्र आलो होतो.

हिंदी महासागराच्या परिसरातील मत्स्य स्त्रोतांचा चिरंजिवी, न्याय्य आणि पर्याप्त वापर करण्यासाठी किनारपट्टीवरील समुदायांची संघटना बांधण्याचा प्रयत्न करणे व या संदर्भातील मुद्यांची चर्चा करणे हा मच्छीमार संघटना, विद्यापीठे, संशोधन संस्था, बिगरसरकारी संघटना आणि शासन यांच्यातर्फे आलेल्या आपल्या सर्वांचा उद्देश होता.

२) हिंदी महासागर परिसरात सागरी जैविक विविधता तसेच जगभरात आढळणाऱ्या माशांच्या व्यापारी जाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. या भागात मासे हा अन्नाचा एक प्रमुख प्रकार आहे. त्याचप्रमाणे व्यवसाय, उत्पन्न आणि परकीय चलन मिळवण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. या भागातील मच्छीमारांची संख्या जगभरात सर्वात जास्त आहे. यापैकी बहुसंख्य मच्छीमारांचा व्यवसाय लघुउद्योग क्षेत्रात मोडतो. ते वेगवेगळ्या प्रकारची स्वत: तयार केलेली (craft-gear) मासेमारीच्या साधनांचा वापर करतात. यापैकी बरेच मच्छीमार हे दारिद्र्यात आहेत. पर्यावरणीय व सामाजिक-आर्थिकदृष्ट्या सागरी किनाऱ्यावरील मासेमारी करणारे समुदाय हे सर्वात अधिक झळ पोहोचलेले व संवेदनक्षम असतात.

३) समन्यायाचा विचार न करता, जागतिकीकरण आणि उदारमतवाद यांच्या व्यंजनामुळे आर्थिक वाढ वेगाने झाली. या आर्थिक वाढीमुळे किनारी प्रदेशात आर्थिक घडामोडींमध्ये अनियंत्रित वाढ झाली. यामध्ये वेगाने झालेला शहरी विकास, प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांच्या संख्येत झालेली वाढ, विलासी पर्यटन आणि कोलंबीची औद्योगिक पातळीवर चालणारी मत्स्यशेती यात झालेल्या वाढीचा समावेश होतो. यामुळे किनारपट्टीवर राहणाऱ्यांच्या जीवनाचा दर्जा खालावण्यास हातभार लागला. तसेच सागरकिनाऱ्यावरील मच्छीमार समुदायांना त्यांच्या पारंपारिक जीवनपद्धती व व्यवसायाच्या क्षेत्राला मुकावे लागले. या प्रवृत्तीवर नियंत्रण घालण्यासाठी पुढील गोष्टी अंमलात आणायला हव्यात :-

- ❖ किनारी प्रदेशातील किनाऱ्यावरील व सागरी भागातील घटक एकत्रित आणून व त्याचा परस्परांशी समन्वय घडवून स्त्रोतांचा वापर व ते स्त्रोत प्राप्त करण्याचे मार्ग यासंबंधी समन्वयी दृष्टीकोन दर्शविणारे परिणामकारक कायदे व संस्था निर्माण करणे.
- ❖ लहान प्रमाणावर मासेमारी करणाऱ्या पारंपारिक सागरी समुदायांना प्रतिनिधित्व देण्यासाठी अनुदानाच्या तत्त्वावर किनारी स्त्रोतांबाबत निर्णय घेणारी सहभागात्मक यंत्रणा निर्माण करणे. तसेच उपजीविकेचे पिढ्यानुपिढ्या चालत आलेले स्त्रोत व त्यांचे वसतिस्थान असणारा किनारी प्रदेशावर किनारी प्रदेशातील मच्छिमार समुदायांचा अग्रहक्काची खात्री देणे आणि किनारपट्टीवरील मच्छीमार समुदायांना त्यांच्या सुरक्षित विकासाची आणि उच्चित रहाणीमानाची खात्री देणे.

४) हिंदी महासागर परिसरातील जीवन हे नाजूक व मोठ्या प्रमाणावर उत्पादनक्षम आहे. या जीवनप्रणालीत जटील जाती व पर्यावरणीय आंतरसंबंध आढळतात. परंतु हिंदी महासागर प्रदेशातील जवळजवळ सर्वच देशांमध्ये किनाऱ्यालगतच्या पाण्यातील मत्स्य स्त्रोतांचा वापर अप्रमाणबद्ध पद्धतीने होतो आणि अतिरेकी घेतो. या भागातील मासे हा कुटूंबांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन आहे. त्यांच्या मच्छीमारी क्षेत्रावर स्वदेशी व विदेशी मच्छीमार बोटींकडून अतिक्रमण केले जाते. हे स्वदेशी व विदेशी मच्छीमार सागरी तळात जाणाऱ्या जाळ्यासारख्या विनाशक साधनांच्या उपयोग करताना योग्य निवड तंत्राचा वापर करीत नाहीत. अशा प्रकारच्या अयोग्य वापरामुळे छोट्या मच्छीमार होड्यांचे नुकसान होते तर काहीवेळा धडक बसून जीवितहानी सुद्धा होते. किनाऱ्यापासून दूर अंतरावर जरी

आत्तापर्यंत न वापरलेले स्त्रोत अस्तित्वात असले तरीही त्यांचे व्यवस्थापन तंत्र अतिशय कमी प्रतीचे आहे किंवा (पूर्णत: अस्तित्वात) नाही. हिंदी महासागरामध्ये खनिजतेल व इतर खनिज संपत्ती सापडते. त्यांचा वापर केला जातो. या महासागरातून जलवहातूकही मोठ्या प्रमाणावर चालते. तसेच शहरी औद्योगिक आणि विषारी दुषिते समुद्रात सोडले जातात. त्यामुळे लहान प्रमाणावर मासेमारी करणाऱ्या समुदायांचे उपजीविकेचे साधन टिकवून धरण्यासाठी आणि या महासागरातील स्त्रोत आणि त्यांची उत्पादनक्षमता व विशुद्धता राखण्यासाठी पुढील गोष्टी करणे आवश्यक आहे.

- ❖ या प्रदेशातील देशांनी मत्स्य व इतर स्त्रोतांचा वापर व व्यवसाय यासंबंधी सामाजिकदृष्ट्या न्याय्य अशा परिसंस्था दृष्टीकोनाचा स्विकार केला आहे.
- ❖ F.A.O. ने दिलेल्या मच्छीमार क्षमतेच्या व्यवस्थापनासंबंधी आंतरराष्ट्रीय कृती नियोजनानुसार प्रशासनांनी विनाशकारी साधने (तळापर्यंत जाणाऱ्या जाळ्यासारखी) शोधून काढून त्यांच्या अतिक्षमतेचे मापन करुन ती कमी करायला पाहिजे आणि सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय दृष्टीकोनातून लघुउद्योग क्षेत्राप्रमाणेच मासेमारीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे औद्योगिक जहाजांची क्षमता अगक्रमानुसार कमी केली जावी.
- ❖ मच्छीमार समुदायामध्ये रोजगाराची संधी टिकविण्यासाठी व ती वाढविण्यासाठी पारंपारिक व आधुनिक तंत्राची सांगड घालणाऱ्या निवडक, कायमस्वरुपी टिकणाऱ्या लहान प्रमाणावर मच्छीमारी करणाऱ्या तंत्रज्ञानाला शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे.
- ❖ संबंधित आंतरराष्ट्रीय संकेत आणि ग्लोबल प्लान ऑफ ॲक्शन फॉर द प्रोटेक्शन ऑफ द मरिन डानव्हायर मेट फ्रॉम लँड वेसूड ॲक्टिव्हिटीज (L.D.A.)यासारख्या योजना उद्देशानुसार सागरी जलवहातूक पायाभूत संरचनांचे विकास, उत्खनन, त्या प्रदेशातील विषारी व इतर टाकावू पदार्थ समुद्रात सोडणे, बहिस्थ जातींचा प्रकार उपलब्ध करुन देणे यासारख्या कृतीमुळे निर्माण होणारे प्रदुषण शासनाने रोखले पाहिजे.

५) प्रदेश व संस्कृती यानुसार किनारपट्टीवरील प्रदेशातील मच्छीमार समुदायांच्या आर्थिक कार्यामधील स्त्रियांच्या भूमिकेत फरक पडतो. परंतु सर्वच समुदायांमध्ये उदरनिर्वाहासंबंधीचे त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. किनारी परिसंस्थेचा दर्जा खालावल्यामुळे व मच्छीमार समुदाय त्यांच्या नैमित्तिक व्यवहारांपासून निष्कासित झाल्यामुळे या समुदायातील स्त्रियांचा कामाच्या भारावर परिणाम झाला व त्यांच्या जीवनाचा दर्जा खालावला. या संदर्भातील कोणत्याही सांखिकीय सामग्रीला किंवा या समुदायामध्ये स्त्रियांच्या कामाला विशेष महत्त्व दिले जात नसल्यामुळे त्याबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. या संदर्भात पुढील गोष्टी करणे आवश्यक आहे.

- ❖ स्त्रियांच्या कामाचे महत्त्व व मूल्य लक्षात घेणे आणि सागरी प्रदेशातील मच्छिमारी समुदायातील स्त्रियांसंदर्भात पायाभूत सांखिकीय सामग्री गोळा करणे.
- ❖ मत्स्य व्यवसायात स्त्रियांचे सद्यकालिन स्थान संरक्षित करणे.
- ❖ निर्णय-प्रक्रिया आणि साधन संपत्तीच्या व्यवस्थापनामध्ये स्त्रियांचा सहभाग असेल याची दक्षता घेणे.
- ❖ संघटित आणि असंघटित / अनौपचारिक क्षेत्रातील मत्स्यप्रक्रिया केंद्रामध्ये काम करणाऱ्या स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा (करणे) घडवून आणणे.

६) मासेमारी करणाऱ्या लहान होड्यांची विनापरवाना सीमा ओलांडणे व त्यामुळे शासनाने त्यांना स्थानबद्ध करणे, शिक्षा देणे या समस्येने किनारपट्टीवरील अनेक समुदायांना तसेच प्रशासकांना ग्रासून टाकले आहे. सागरी कायद्यासंदर्भातील युनायटेड नेशन्सच्या १९८८ च्या संकेतानुसार निवडक आर्थिक विभागांसंदर्भातील जाहिरनाम्याचा हा परिणाम आहे. या जाहिरनाम्यामुळे काही वेळा किनारपट्टीवरील मासेमारी करणाऱ्या समुदायांना त्यांच्या पारंपारिक मासेमारी क्षेत्रात मच्छीमारी करण्यास बंदी घातली जाते. हा इतर काही गोष्टींचाही अपरिहार्य परिणाम आहे. उदा. छोट्या मत्स्यव्यवसायिकांच्या होड्यांची कार्यक्षमता वाढली. त्याचप्रमाणे स्थानिक सागरी मत्स्य स्त्रोत संकुचित झाले ही जटील समस्या सोडविण्यासाठी मच्छिमारांच्या मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार उपाय करणे आवश्यक आहे. या संदर्भात पुढील मुद्दे महत्त्वाचे आहेत.

- ❖ मच्छीमारांना दुसऱ्या देशाच्या सागरी हद्दीत केल्या जाणाऱ्या अटक व स्थानबद्धतेच्या संदर्भात युनायटेड नेशन्सच्या १९८२ मध्ये केलेल्या संकेतातील ७३व्या कलमाचा भंग होणार नाही अशा प्रकारे कायद्याची अंमलबजावणी केली जावी आणि तो १९७६ मधील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांबाबत आंतरराष्ट्रीय कोहिनंटला धरुन असावा. बेकायदेशीर मासेमारीसंदर्भात आकारला जाणारा दंड प्रमाणबद्धतेच्या आणि गरजेच्या तत्त्वावर आधारलेला असावा.
- ❖ शासनाने अटक झालेल्या मच्छीमारांना सोडवून त्यांना मायदेशी रवाना करण्यासाठी यंत्रणा उभारण्याला अग्रक्रम द्यावा.
- ❖ जी पारंपारिक मासेमारीची क्षेत्रे आंतरराष्ट्रीय सीमांजवळ आहेत तिथे रहाणाऱ्या व मासेमारी करणाऱ्या समुदायांच्या संदर्भात सागरी हद्दींची कडक अंमलबजावणी केल्यास होणारे भयंकर परिणाम लक्षात घेऊन इतर राष्ट्रीय संबंध व संरक्षण, त्याचबरोबर या समुदायाचे हितसंबंध जपले पाहिजेत.
- ❖ छोट्या होड्या घेवून बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना प्रादेशिक सागरी हद्दीत अटक केल्यावर त्यांच्यावर कारवाई करताना बेकायदेशीर स्थलांतर करणारांविरुद्ध घेतल्या जाणाऱ्या कायदेशीर कारवाईसारखी करू नये. यासारख्या प्रकरणांमध्ये बेकायदेशीर मच्छिमारीही ई ई झेडमध्ये न घडता किनाऱ्यालगतच्या राष्ट्राच्या खास मालकीच्या समुद्राच्या पट्ट्यात घडते आहे हे लक्षात घेऊन शिक्षा दिली जावू नये. अशा प्रकारच्या बेकायदेशीर मच्छिमारीपेक्षाही 'ई ई झेड' चे उल्लंघन करणे हा अधिक तीव्र स्वरुपाचा गुन्हा आहे.
- ❖ मच्छिमारांना दोन राष्ट्रांमधील सागरी हद्दीसंबंधातील विवादाचा बळी केले जावू नये उपजीविकेसाठी आवश्यक मत्स्य स्त्रोत उपलब्ध करुन देण्यासाठी राष्ट्रांनी तजवीज करावी.

७) जास्त सहनशक्ती असणाऱ्या लहान आकाराच्या होड्या आणि मासेमारीच्या ठराविक पद्धतीच्या वापरामुळे असे दिसून आले आहे, की समुद्र किनारा नसणाऱ्या देशांकडून वापरली जाणारी मोठी औद्योगिक जहाजे स्थलांतर करणारे मासे पकडण्यासाठी अनावश्यक आहेत. किनारपट्टीवरील देशांमध्ये हे लघूउद्योगक्षेत्रांच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक आहेत. आवश्यकतेपेक्षा अधिक मत्स्य स्त्रोत उपलब्ध असणाऱ्या समुद्रकिनाऱ्यावरील देशांनी परिणामकारक नियंत्रण ठेवून व जबाबदारी घेवून अशा प्रकारच्या मासेमारी करणाचा समुद्राला योग्य असणाऱ्या लहान मच्छीमार होड्यांना अग्रक्रमाने सवलती दिल्या पाहिजेत.

- ❖ शासनाने ज्या ठिकाणी अशा संधी उपलब्ध असतील त्या ठिकाणी लहान प्रमाणात लांब पल्ल्याच्या होड्यांना अशा प्रकारची मासेमारी कायदेशीररित्या व जबाबदारीने करण्यासाठी त्यांच्याशी करार करावा.
- ❖ शासनाने अतिरिक्त क्षमता व मासेमारीच्या विनाशक पद्धतीची निर्यात करू नये.
- ❖ 'इंटरनॅशनल प्लॅन ऑफ ॲक्शन टू प्रिव्हेंट', 'डिटर अँड डालिमनेट इल्लिगल अन्‌रिपोर्टेड अँड अन् रेग्यूलेटेड फिशिंग (आय.पी.ओ.ए. - आय.यू.यू.)' च्या नुसार शासनाने बेकायदेशीर व नोंदणी नसलेले आणि अनियंत्रित (आय.यू.यू.) मासेमारी करण्यास बंदी घालण्याची, धाक निर्माण करण्याची व त्याचा बिमोड करण्याची ताकद शासनाकडे असली पाहिजे. ही गोष्ट छोट्या आणि विकसनशिल देशांच्या दृष्टीने विशेषत: छोट्या बेटांवर असणाऱ्या विकसनशील देशांच्या दृष्टीने जास्त महत्त्वाची आहे. कारण हे देश अन्नाबाबतची सुरक्षितता, आर्थिक संपन्नता आणि विकास याकरिता त्यांच्या मत्स्यस्त्रोतांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात.

८) वर्तमान मासेमारी पद्धतीप्रमाणे हिंदी महासागर प्रदेशातील मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करणाऱ्या मौल्यवान मत्स्यसाठ्याचे प्रमुख लाभधारक मच्छिमारी क्षेत्र असणाऱ्या किनारी देशांपैकी नाहीत. गेल्या काही वर्षामध्ये काही राष्ट्रांनी मासेमारीचे आधुनिक तंत्र आत्मसात केले आहे. परंतु याचा अर्थ १९८२ च्या करारानुसार त्यांचा वहिवाटीचा हक्क प्रस्थापित झाला आहे, असे समजता कामा नये.

याऐवजी पुढील मुद्यांच्या आधारे मत्स्यस्त्रोत मिळविण्यासंबंधीचे निर्णय घेतले जावेत.

- ❖ मासेमारीच्या वास्तव परंपरांचा वापर करणे.
- ❖ देशाच्या अर्थव्यवस्थेचे या स्त्रोतांवर असलेले अवलंबित्व.
- ❖ या प्रदेशातील विकसनशील देश व छोट्या बेटांवरील विकसनशील देशांची आर्थिक आणि सामाजिक विकासाची सुप्त शक्ती.

९) किनारपट्टीवरील देशांनी दूर अंतरावर मासेमारी करणाऱ्या राष्ट्रांबरोबर मासेमारीचा केलेला करार हा त्यांच्या अर्थव्यवस्थेकरता किंवा किनारपट्टीवरील त्यांच्या मासेमारी समुदायांकरिता दीर्घ मुदतीकरिता लाभदायी ठरलेला नाही. असे दिसून आले आहे की, आंतरराष्ट्रीय स्तरांवरील विरोधाला न जूमानता साधन आणि व्यापाराची व्यवस्था आणि मच्छीमार सवलत कराराच्या अटी यांच्यात दुवा निर्माण केल्यामुळे उद्‌भवलेल्या दबावांचा हा परिणाम आहे. मासेमारीची न्याय्य व्यवस्था निर्माण करण्यासाठी पुढील गोष्टी अंमलात आणल्या जाव्यात.

- ❖ जबाबदार मासेमारीसाठी असलेल्या च्या आचारसंहितेतील ११-२-७ आणि ११-२-८ या कलमांचा अवलंब शासनाने करावा ही कलम राष्ट्रांना बाजारपेठ मिळविण्यापासून परावृत्त करतात.
- ❖ शासनाने मासेमारीसंदर्भात राष्ट्रीय धोरण ठरवावे या धोरणात दूर अंतरावर मासेमारी करणाऱ्या देशांबरोबर कोणत्याही वाटाघाटी करण्यापूर्वी किनाऱ्यावरील मासेमारी समुदायांचे हक्क व गरजा लक्षात घ्याव्यात भ्रष्टाचाराबरोबर लढण्यासाठी शासनाने दूर अंतरावर मासेमारी करणाचा कंपन्या आणि संयुक्त उपक्रम आणि करार हाताळताना पारदर्शकता ठेवावी आणि उत्तरदायित्व स्विकारावे.
- ❖ आंतरराष्ट्रीय कामगार संघटनांचा जाहीरनामा आणि इतर मान्यताप्राप्त कायदे आणि संकेताप्रमाणे दूर अंतरावर मासेमारी करणाऱ्या जहाजांमध्ये कामाची परिस्थिती आणि सेवा असायला पाहिजेत.

१०) विकासाचे पर्याय कौशल्ये, क्षमता, अनुभव आणि माहिती यामध्ये सहभागी होण्यासाठी व आपापसात आंतरक्रिया घडण्यासाठी हिंदी महासागर प्रदेशातील किनाऱ्यावरील समुदाय उभे टाकले आहेत. औद्योगिकरण आणि मासेमारीच्या क्षेत्राबाबतच्या विकासाच्या धोरणांचा पाठपुरावा करताना आशिर्वाद देशांना आलेल्या नकारात्मक अनुभवावरुन हिंदी महासागराच्या पश्चिमेकडील प्रदेशातील अनेक देशांना धडा घेण्याजोगा आहे. काही वर्षापूर्वी किनार पट्टीवरील मत्स्य स्त्रोत आणि पीट संस्थेवर दुष्परिणाम झाला होता. उदा. कोळंबीचा औद्योगिक पातळीवर चालणारा मत्स्य शेतीचा किनारपट्टीवरील समुदायांच्या उपजीविकेवर व किनारपट्टीवरील मूळ स्थानावर दुष्परिणाम झाला आहे.

११) वरील मुद्दे लक्षात ठेवून त्याचप्रमाणे समुदाया आधारित अनेक सकारात्मक उदाहरणे व चिरंजीवी विकासाचे पर्याय लक्षात घेवून दक्षिण-दक्षिण संघटन बळकट करणे आवश्यक आहे. यासाठी विशेषत: पुनरुज्जीवनाचे प्रयत्न, स्त्रोत संधारण आणि समुदाय विकास प्रकल्पामधील अनुभवांची देवाण-घेवाण, पर्यावरणदृष्ट्या निवडक आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर आणि मानवी स्त्रोत क्षमतेची उभारणी या गोष्टी निगडीत आहेत.

जागतिक शांततेला दिल्या गेलेल्या वर्तमानकालीन आव्हानांच्या मध्यावर आणि यूनायटेड नेशन्सने जाहीर केलेल्या ‘डायलॉग अमंग सिव्हिलायझेशन’च्या वर्षात हे दृष्टी विधान स्विकारताना आम्ही हिंदी महासागराच्या भवितव्यातील सागरी समुदायांमध्ये एकजूट आणि राष्ट्रांमधील सहकार्य वाढीला लावण्यासंबंधीची आमची जबाबदारी आणि कर्तव्य याबाबत विशेष जागृत आहोत.